डॉ.बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ,लोणेरे

Dr. Babasaheb Ambedkar Technological University, Lonere

वेद्याविहार,लोणेरे-रायगड ४०२ १०३(महाराष्ट्र)Vidyavihar, Lonere - Raigad 402 103 (Maharashtra)

Tel: (02140) 275142 Student Helpline: 02140 - 275212

Website: www.dbatu.ac.in, E-mail: registrar@dbatu.ac.in

क्र. डॉबाआंतंवि/पुणे/निविदा/वाहन/२०२६/५०१८

दिनांक: ०४/११/२०२६

प्रति,

विषय: चारचाकी वाहन भाडेतत्वावर पुरविण्यासाठी दोन वर्षाकरिता दर करार करणेसाठी निविदा मागविणेबाबत.

महोदय,

वरील विषयास अनुसरुन आपणास कळविण्यात येते की, डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ, लोणेरे जि. रायगड, यांचे आस्थापना खालील विद्यापीठाचे विभागीय केंद्र पुणे व मुंबई येथील कार्यालयीन व परिक्षा विषयक कामासाठी चारचाकी वाहन भाडेतत्वावर घेण्यासाठी प्रस्तावित आहे. त्याकरिता दोन वर्षासाठी दरकरार करण्याकरिता देकार मागवित आहोत. त्यासाठी खालील अटी व शर्तींच्या अधिन राहून खालील प्रकारच्या वाहनांचे प्रती - कि.मि. चे दर नमुद करावे. आपली निविदा कुलसचिव, डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ लोणेरे, ता. माणगाव, जि. रायगड यांना उद्देशून प्रस्तुत विद्यापीठाच्या पुणे विभागीय केंद्राच्या पत्त्यावर दि. ०४/११/२०२६ पासून २६/११/२०२६ पर्यत किंवा त्यापूर्वी पोहोचतील अशा बेताने समक्ष किंवा रजिस्टर पोस्टाने सिलबंद पाकीटात पाठवावी. सदर दिनांक नंतर प्राप्त होणाऱ्या निविदा कोणत्याही परिस्थितीत विचारात घेतल्या जाणार नाहीत.

अ. क्र.	वाहनाचा प्रकार	प्रति दर	कमीत कमी फिक्स दर	थांबावे लागल्याचे शुल्क	दर प्रति कि.मि (AC)	दर प्रति कि.मि (NON AC)	हमाली शुल्क
१	टेम्पो ट्रॅव्हल्/ पिकअप व्हॅन बंद शटर सहित (मर्यादा किमान २ टन साहित्य)						
२	Ertiga						
३	Tavera/Innova						
४	टाटा इंडिका Vista						
५	Swift						
६	६०८ टेम्पो व पिकअप व्हॅन बंद शटर सहित						
७	टाटा/ट्रक (मर्यादा किमान १४ टन साहित्य) १०० कि.मि						
८	टाटा/ट्रक (मर्यादा किमान १४ टन साहित्य) १००० कि.मि						

Scanned with OKEN Scanner

अटी व शर्ती

१. प्रत्येक वाहनांसाठी वाहनाच्या नावासमोर दर्शविण्यात आल्याप्रमाणे दर लिहावेत.

२. वाहन पुरवठादाराला वाहने ही रायगड, अहिल्यानगर, बारामती, नाशिक, पालघर, मुरबाड, मुंबई व अन्य ठिकाणी ने-आण करणे यासाठी पुरवावी लागतील.

३. वाहनाचे दर हे दोन वर्षाकरिता बंधन कारक राहतील. आपण दिलेली सेवा समाधानकारक वाटल्यास करार अजून एक वर्ष वाढवता येईल.

४. प्रत्येक वाहनासाठी टॅक्सी परमीट व माल वाहतुक परमीट वाहना नुसार असणे आवश्यक आहे.

५. वाहने ही २०१२ पुर्वीची नसावीत व सुस्थितीत असावीत.

६. कमीत कमी दर देणाऱ्या एजन्सीला वाहन भाडेतत्वार पुरवण्याचा ठेका देण्यात येईल.

७. ज्या वाहन पुरवठादाराला ठेका दिला जाईल त्याने मागणीनुसार वाहने पुरविणे हि त्याची जबाबदारी राहिल. त्यात तो असमर्थ ठरल्यास पुरवठादारावर विद्यापीठ स्थरावर कार्यवाही करण्यात येईल ती दंडात्मक स्वरुपाची असेल किंवा दरकरार रद्द करणे अशा दोन्ही कार्यवाहया करण्यात येतील.

८. वाहन भाडयामध्ये वाहन चालकाचा वेतन, वाहन दुरुस्तीचा खर्च, इंधन, पथकर व इतर प्रासंगिक खर्च पुरवठादाराकडे अंर्तभुत असतील.

९. प्रत्येक वाहनाचा विमा (Third Party) असणे आवश्यक आहे.

१०. वाहनाचा अपघात झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी वाहन पुरवठादाराची राहिल.

११. वाहन प्रवासामध्ये चालविण्या जोगे नसल्यास वाहन पुरवठादार दुसरे वाहन उपलब्ध करुन देईल व विद्यापीठाला अशा परिस्थीत वाहन भाडयाने करावे लागल्यास त्याचा खर्च ठेका प्राप्त वाहन पुरवठादार अदाई करेल.

१२. वाहन चालकाकडे अधिकृत वाहन चालविण्याचा परवाना असणे आवश्यक आहे.

१३. वाहन चालकाने त्याच्या कर्तव्यपालनाच्या वेळी शिष्टाचार पाळणे आवश्यक आहे. त्याचा जवळ स्वत:चा मोबाईल असणे आवश्यक आहे.

१४. वाहन चालक व वाहन पुरवठादार यांना वाहन वापरणाऱ्या अधिकाऱ्याचे/प्रधिकाऱ्याच्या सुचना पाळाव्या लागतील.

१५. विद्यापीठ सर्व निविदा स्विकारणे किंवा रद्द ठरविण्याचे अधिकार राखून ठेवत आहेत.

१६. निविदेनुसार तुलनात्मक दृष्टया कमी दर देणाऱ्या वाहन पुरवठादाराला संस्थेशी दर करार करावा लागेल.

आपला विश्वासू

कुलसचिव

डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ लोणेरे, जि. रायगड

Scanned with OKEN Scanner